
2017-2018

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal



*Chief Editor*

**Dr Kalyan Gangarde**

# Contents


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | *Neurosis* and Robert Browning: A Study of *Neurotic* Characters in Browning's *Porphyria's Lover* and *My Last Duchess* | Mahmudul Hasan | 5 |
| 2. | Transitoriness in the Novels of Amit Chaudhuri | Madhuri Pandey | 9 |
| 3. | Lexico-Semantic Analysis of Kashmiri Language and its Pattern in Social Context | Dr. Ravi Kant Dwivedi | 16 |
| 4. | Lal Ded and HabbaKhatoon: A Feminist Perspective | Zahoor Ahmad | 18 |
| 5. | .Rasul Mir: the Keats of Kashmir | Zahoor Ahmad Lone | 21 |
| 6. | Memories of Pain and Suffering in Novels of Isabel Allende | Mohd Yaseen Rather | 23 |
| 7. | Customer Satisfaction on Providing Services of Life Insurance Corporation (LIC) - … | Koyel Sutar & Utpal Gain | 26 |
| 8. | Colonial Violence In The Novels Of J.M. Coetzee … | Mr. Vijayanand Bansode | 32 |
| 9. | Divergence and Coalition of Cultures in Jhumpa Lahiri's *Unaccustomed Earth* | Dr. D.R. Mane | 36 |
| 10. | Graded Inequality and Victimisation in Premanand Gajvee's *Kirwant* | Sandip Arun Ingle | 40 |
| 11. | Learner's Learning Styles, Study Habits and Academic Performance | Amita Kendurkar | 42 |
| 12. | Body –Mind Wellness and The Role Of Yoga | Dr. Vijayeshwari Rao | 46 |
| 13. | Voicing The Voiceless: Contemperory African American Writers | Mohammed Omer | 49 |
| 14. | पार्वतीबाई पटवर्धन यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | डॉ. गोविंद मा. तिरमनवार | 52 |

14.

# पार्वतीबाई पटवर्धन यांचे स्वातंत्र्य लढयातील योगदान

डॉ. गोविंद मा. तिरमनवार
सहेयागी प्राध्यापक
स्व. दत्तात्रंय पुसदकर कला महा.
नांदगाव पेठ, ता. जि.अमरावती.

***सारांश :*** *अमरावतीचे थोर समाजसेवक व स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय असलेले जेष्ठ नेते डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या सहधर्मचारिणी सौ. पार्वतीबाई यांनी स्वातंत्र्य लढयात महत्त्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्य लढयात सहभागी झालेल्या विदर्भातील महिलांमध्ये पार्वतीबाई या आघाडीवर होत्या. असहकार आंदोलनापासून तर देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यत पार्वतीबाईनी डॉ. शिवाजीराव पटवर्धनांसोबत धडाडीने कार्य केले. स्वातंत्र्य आंदोलनादरम्यान त्यांना तुरूंगवासही भोगावा लागला. विदर्भातील स्त्री पुढाऱ्यांपैकी पार्वतीबाई या अटक होणाऱ्या पहिल्या महिला होत्या. तसेच त्या अमरावती जिल्हयातील पहिल्या महिला सत्याग्रही होत्या. पार्वतीबाईनी राष्ट्रभक्तीने प्रेरित होवून देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले योगदान प्रेरणादायी व अविस्मरणीय असेच आहे. पार्वतीबाई पटवर्धन आपल्या कार्याने अजरामर ठरल्या.*

भारतीय स्वातंत्र्य लढयात देशभरातील महिला मोठया संख्येने सहभागी झाल्या. स्वातंत्र्य लढयात भारतीय महिलांनी दिलेले योगदान अविस्मरणीय असे आहे. विदर्भातील महिलांही स्वातंत्र्य लढयापासून दूर राहिल्या नाही. विदर्भातील अनेक महिलांनी स्वातंत्र्य लढयात सहभाग घेतला. स्वातंत्र्य लढयात सहभागी विदर्भातील महिलांमध्ये पार्वतीबाई शिवाजीराव पटवर्धन यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. स्वातंत्र्य लढयादरम्यान अटक झालेल्या विदर्भातील स्त्री पुढाऱ्यांपैकी पार्वतीबाई या अटक होणाऱ्या पहिल्या महिला होत्या. तसेच त्या अमरावती जिल्हयातील पहिल्या महिला सत्याग्रही होत्या. असहकार आंदोलनापासून तर देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत पार्वतीबाईनी धडाडीने कार्य केले. त्यांचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान अविस्मरणीय असे आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढयात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या पार्वतीबाई पटवर्धन यांचा जन्म 1 जानेवारी 1900 रोजी सातारा जिल्हयातील वडूस या गावी झाला.[1] त्यांचे मूळ नाव गंगुताई. त्यांचे वडील आप्पासाहेब मराठे पुढे नागपूरला आले. त्यामुळे पार्वतीबाईचे काही शिक्षण नागपूरच्या भिडे कन्या शाळेत झाले. काही शिक्षण पुण्याच्या प्रसिध्द हुजूरपागा शाळेत झाले. विद्यार्थी दशेतच पार्वतीबाईच्या मनात राष्ट्रभक्ती रूजली होती. पार्वतीबाईच्या मनातील देशभक्ती ओळखून ॲनी बेझंट यांनी त्यांना बनारसला नेले. पार्वतीबाईनी बनारसच्या कन्या विद्यालयातून मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण केली.[2] अमरावतीचे थोर समाजसेवक व स्वातंत्र्य आंदोलनात महत्त्वाचे योगदान देणारे डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्याशी 1918 साली पार्वतीबाईचा विवाह झाला. तेव्हापासून गंगूताई मराठे या पार्वतीबाई पटवर्धन झाल्या.[3]

देशसेवा व समाजसेवा यासाठी आयुष्य झिजविणारे डॉ. शिवाजीराव उर्फ दाजीसाहेब पटवर्धन यांच्याशी विवाह झाल्यापासूनच पार्वतीबाईच्या देश व समाजसेवेच्या कार्याला प्रारंभ झाला. कष्टमय जीवन जगण्याची तयारी आणि सामाजिक कार्य करण्याची आवड असल्यासच लग्न करता येईल याची जाणीव लग्नापूर्वीच शिवाजीरावांनी पार्वतीबाईना दिली होती. समाजसेवा व देशसेवा करणाऱ्या माणसाला सर्वसामान्य माणसासारखा संसार करता येत नाही. त्याला कामासाठी बराच वेळ द्यावा लागतो. प्रसंगी घरादारावर तुळसीपत्र ठेवावे लागते. वैयक्तिक सुखाची

आहुती द्यावी लागते. या सर्व गोष्टीची जाणीव त्यांनी पार्वतीबाईंना विवाहाआधीच करून दिली होती.[4] पार्वतीबाईंच्या मूळ पिंड समाजसेवा व देशसेवेचा असल्यामुळे त्या आनंदाने शिवाजीरावांच्या कार्यात सहभागी झाल्या. पार्वतीबाईंनी शिवाजीरावंसोबत स्वातंत्र्य लढयात महत्त्वाचे योगदान दिले. भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात ज्या दांपत्यांनी सक्रिय सहभाग घेवून महत्त्वाची भूमिका बजावली त्यात अमरावतीचे पटवर्धन दाम्पत्य प्रमुख आहे. असहकार आंदोलनापासून ते देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत पार्वतीबाई व शिवाजीराव पटवर्धन यांनी मोलाचे योगदान दिले.

स्वातंत्र्य आंदोलनात 1920 पासून अमरावतीच्या महिलांनी सक्रिय सहभाग घेण्यास सुरवात केली. 1920 साली पार्वतीबाई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या सदस्य झाल्या. असहकार चळवळीत पार्वतीबाई अग्रेसर होत्या. असहकार चळवळीचा जोर वाढावा या हेतूने गांधीजींचे संपूर्ण हिंदूस्थानमध्ये प्रचार दौरे सुरु होते. 29 मार्च 1921 ला महात्मा गांधी अमरावतीला आले. त्या दिवशी अमरावतीतील स्त्री समुदायासमोर महात्मा गांधीजींचे भाषण होणार होते. महात्मा गांधीजी सोबत त्यांच्या धर्मपत्नी कस्तुरबा गांधीही होत्या. या सभेला तीन हजार स्त्रिया जमल्या होत्या. या सभेमध्ये स्त्रियांना बसण्याची व्यवस्था पार्वतीबाई करीत होत्या.[5] शिवाजीराव व पार्वतीबाई या दांपत्यांच्या कामगिरीमुळे महात्मा गांधी प्रभावित झाले होते. असहकार चळवळी दरम्यान पार्वतीबाईंनी अनेक ठिकाणी भाषणे देवून त्यांनी असहयोग व विदेशी कापडावर बहिष्कार याचा प्रचार केला. 1929 मध्ये प्रांतिक कॉंग्रेस कमिटीतर्फे विदर्भातील अनेक गावांना भेटी देवून पार्वतीबाईंनी राष्ट्रीय कार्याचा प्रसार केला.

1930 मध्ये सविनय कायदेभंग चळवळीत पार्वतीबाईंनी दाखविलेली धडाडी आणि केलेले कार्य उल्लेखनीय व प्रेरणादायी आहे. कायदेभंग चळवळी दरम्यान पार्वतीबाईंनी अनेक ठिकाणी व्याख्याने देवून चळवळीला गती आणली. स्वातंत्र्य लढयात सक्रिय असलेल्या आपल्या पतीला म्हणजे डॉ. शिवाजीराव पटवर्धनांना पार्वतीबाईंनी मनापासून साथ दिली. ज्याप्रमाणे महात्मांजीसाठी कस्तुरबा गांधीनी स्वराज्य कामामध्ये स्वतःला वाहून घेतले होते. तोच आदर्श पार्वतीबाईंनी आपल्या समोर ठेवला होता. कायदेभंग चळवळींतर्गत ठिकठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. अमरावती जिल्हयात ठिकठिकाणी झालेल्या जंगल सत्याग्रहात पार्वतीबाई सहभागी झाल्या.[6] शिवाजीराव पटवर्धन तुरूंगात असतांना स्वातंत्र्य चळवळीचा भार पार्वतीबाईंनी स्वतःच्या अंगावर घेतला. 1 नोव्हेंबर रोजी नेहरू मैदानावर दारूच्या गुत्याच्या लिलावाविरूध्द जाहीर सभा झाली. त्यात पार्वतीबाई पटवर्धन यांचे भाषण झाले. 3,4,5 नोव्हेंबरला दारूच्या गुत्याचे लिलाव ठरले होते. पिकेटींगच्या भितीने सरकारने गावगावच्या मक्तेदारांना अगोदरच कोर्टाच्या आवारात आणण्याचा प्रयत्न सुरु केला. ही बातमी कळताच पार्वतीबाईंने 2 तारखेला दुपारी 2 वाजता पिकेटींग सुरू केले. त्यावेळी त्यांच्यासोबत 50 देशसेविका व 150 स्वयंसेवक होते. पुन्हा 3 तारखेला सकाळी 7 वाजता पिकेटींग सुरू झाल्याने एकही उमेदवार आत जावू शकला नाही. पिकेटींग चालू असतांना अधिकारी वर्गाने चिडून जावून पार्वतीबाई यांना 5 नोव्हेंबर 1930 ला 117 कलमाखाली अटक केली. वऱ्हाडातील स्त्री पुढाऱ्यांपैकी अटक होण्याचा पहिला मान पार्वतीबाईंना आहे.[7] विशेष म्हणजे डॉ. शिवाजीराव पटवर्धन तुरूंगात गेल्यानंतरही त्यांनी आपल्या अप्रतिम भाषण शैलीने, उत्कृष्ट वक्तृत्वाने अमरावती जिल्हयामध्ये जागृती केली. देशसेविका संघ स्थापन करून निरनिराळया मोहल्ल्यात व्याख्याने दिली. त्याद्वारे स्त्रियांची संघटना मजबूत केली. मुलींच्या प्रभात फेऱ्या सुरू केल्या. तालुक्याच्या ठिकाणी जावून व्याख्याने दिली. सत्याग्रहामध्ये रणक्षेत्रावर हजर राहून स्वयंसेवकांना प्रोत्साहन दिले. या दरम्यान त्यांची लहान मुलगी आजारी पडून वारली असतांना सुध्दा मोठया धैर्याने व चिकाटीने त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले. गांधी–इर्विन करारामुळे पार्वतीबाईंची मार्च 1931 साली तुरूंगातून सुटका झाली.[8]

1932 साली कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरू होताच पार्वतीबाईंच्या सभा अमरावतीत परत सुरू झाल्या. उत्तेजक भाषण करण्याच्या आरोपावरून सरकारने पार्वतीबाईंवर खटला भरला आणि त्यांना अटक करून खटला पुढे चालू ठेवण्यात आला. 26 फेब्रुवारी 1932 रोजी खटल्याचा निकाल लागला. पार्वतीबाईंना एक वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा देण्यात आली. या शिक्षेविरूध्द पार्वतीबाईंनी वरिष्ठ कोर्टाकडे अपील केले होते. पण सेशन कोर्टाने खालच्या कोर्टाचा निकाल कायम ठेवला होता. पार्वतीबाईंना सक्त मजूरी

ऐवजी साधी कैद देण्यात आली. त्यांना नागपूरच्या तुरुंगात ठेवण्यात आले.[9] 15 सप्टेंबर 1932 ला नागपूर सेन्ट्रल जेलमधून पार्वतीबाईंची सुटका झाली. त्यांनी कोर्टाकडे केलेल्या अपिलाचा निकाल ॲडिशनल ज्युडिशियल कमिश्नर श्री भवानीशंकर नियोगी यांनी 3 ऑक्टोंबर रोजी दिला. त्यामध्ये पार्वतीबाईंना निर्दोष ठरवून मुक्त केले होते. तोपर्यंत पार्वतीबाईंनी पाच महिन्यांची शिक्षा भोगली होती.

1942 च्या चलेजाव चळवळी दरम्यान डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांना अटक झाल्यानंतर त्यांच्या कार्याचा भार पार्वतीबाईंनी यशस्वीरित्या सांभाळला. दुसऱ्या महायुध्दामुळे महागाई वाढून अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली होती. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सरकारी धान्य पुरवठयाची योजना, पिकाची वास्तविक स्थिती, शेतकरी, शेतमजूर व इतर जनता यांना पुढील हंगामापर्यंत लागणारा ज्वारीचा साठा हे प्रश्न सोडविण्यासाठी पार्वतीबाईंच्या अध्यक्षतेखाली एक सर्व पक्षीय 'अमरावती जिल्हा धान्य पुरवठा समिती' स्थापन करण्यात आली होती. पार्वतीबाईंच्या अध्यक्षतेखालील या समितीच्या कार्यामुळे अन्नधान्य टंचाईची समस्या मिटली. शिवाजीराव पटवर्धन तुरुंगात असताना सुध्दा त्यांचे घर क्रांतीकाराचे निवासस्थान होते. देशभक्त मंडळीसाठी स्वातंत्र्य लढयावर चर्चा करण्याचे ते एक ठिकाण होते. पार्वतीबाईंनी शिवाजीरावांची कमतरता कुणालाही जाणवू दिली नाही.[8]

1920 पासून पार्वतीबाईंनी सुरू केलेले राष्ट्रीय कार्य देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत अविरत सुरू होते. राष्ट्रीय कार्यात स्वतःला वाहून घेतलेल्या पार्वतीबाईंनी सामाजिक कार्यही मनापासून केले. पार्वतीबाईंनी राष्ट्रभावनेने प्रेरित होवून देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले योगदान अभिमानास्पद व अविस्मरणीय असेच आहे. देशसेवा व जनसेवा यासाठी आयुष्य झिजविणाऱ्या पार्वतीबाईंचे 26 जून 1984 रोजी निधन झाले. पार्वतीबाई शिवाजीराव पटवर्धन आपल्या कार्याने अजरामर झाल्या.

## संदर्भ


1. अनु भागवत, बिल्वदल, मेधा पब्लिशिंग हाउस, अमरावती 2013, पृ. 83.
2. कित्ता, पृ. 85, 86.
3. व. म. गुप्ते (संपा) डॉ. शिवाजीराव पटवर्धन जन्मशताब्दी गौरव विशेषांक, सुभाष मुद्रणालय, तपोवन, अमरावती 1992, पृ. 6.
4. तु. अ. घावट, शिवाजीराव पटवर्धन यांचे स्वातंत्र्य लढयातील व सामाजिक क्षेत्रातील योगदान – एक चिकित्सक अभ्यास, अप्रकाशित लघु शोधप्रबंध, पृ. 15.
5. भि. दे. कारंजकर, अमरावती शहराचा इतिहास, भाग 1 व 2, मुख्याधिकारी नगरपालिका, अमरावती, 1978, पृ. 417, 418.
6. कित्ता, पृ. 650, 651.
7. कित्ता, पृ. 665.
8. कित्ता, पृ. 712, 713.
9. कित्ता, पृ. 759.
10. तु. अ. घावट, उपरोक्त पृ. 71.


□□□